*MHAM180011332026*

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३८८/२०२६ मधील नि.क्र.१ वरील आदेश**
**शांताबाई मारोतराव गावंडे विरुध्द निरंक**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांच्या अर्जातील कथने थोडक्यात खालील प्रमाणे –

अर्जदार शांताबाई मारोतराव गावंडे यांचे पती **मयत मारोतराव सिताराम गावंडे** यांचा मृत्यु दिनांक १२/०९/२०१६ रोजी नागपूर, ता.जि.–नागपूर येथे झाला. **मयत मारोतराव** यांच्या आईचा मृत्यु बऱ्याच वर्षापूर्वी झाला आहे. अश्या प्रकारे अर्जदार ही **मयत मारोतराव** यांची कायदेशीर वारस आहे.

३. प्रस्तुत प्रकरणात आक्षेप मागविण्यासाठी **दि. २९/०४/२०२६** रोजी **दैनिक वरुड दर्पण (नि.क्र.१३)** या वृत्तपत्रात जाहीर प्रगटन दिले होते. तसेच ग्राम पंचायत कार्यालय, वाठोडा, ता.–वरुड, जि.–अमरावती व तहसिल कार्यालय, वरूड येथे देखील जाहीर प्रगटन **(नि.क्र.०६)** लावण्यात आले होते, परंतु कोणीही आजपर्यंत आक्षेप नोंदविला नाही.

४. अर्जदाराने अर्जातील कथनाच्या पृष्ठयर्थ अर्जदार क्र.१ शांताबाई मारोतराव गावंडे, व सा.क्र.२ प्रकाश सितारामजी बोबडे, यांच्या पुराव्याचे शपथपत्र अनुक्रमे **नि.क्र.०९ व नि.क्र.१०** वर आहे. जन्म मृत्यू कार्यालय, नागपूर यांनी दिलेले **मयत मारोतराव** यांचे मृत्युचे प्रमाणपत्र **नि.क्र.११** वर आहे. जाहीरात दिल्याची पावती **नि.क्र.१२** वर आहे, जी अर्जातील कथनांशी सुसंगत व समर्थनीय आहेत.

५. त्यामुळे अर्जदार हाच **मयत मारोतराव** यांचे वारस आहे हे सिध्द होते. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

*MHAM180011332026*

**– <u>आ दे श</u> –**

१)	प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२)	अर्जदार शांताबाई मारोतराव गावंडे हि **मयत मारोतराव सिताराम गावंडे** यांची कायदेशीर वारस असल्याने तिला वारस दाखला देण्यात येत आहे.

३)	सदर वारस दाखला हा फक्त शासकिय व निमशासकिय उद्देशा करीता देण्यात येत आहे.

४)	आवश्यक ते न्यायालयीन शुल्क दिल्यावरच वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

**स्वाक्षरी/–**

**(आय. जे. ठाकरे)**

**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, वरुड**

**दिनांक : २१/०७/२०२६**

**ठिकाण : वरुड**